# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com


11/9/23
4:45

दिनांक : ११/०९/२०२३

# प्रेसनोट

केंद्र शासनाच्या वने, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागामार्फत राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रम अंतर्गत दिनांक ७ सप्टेंबर, २०२३ हा दिवस निळया आकाशासाठी आंतरराष्ट्रीय शुध्द हवा दिवस (International Day Of Clean Air For Blue Skies ) साजरा करताना शहरातील नागरीकांमध्ये हवेची गुणवत्ता चांगली राखण्यासाठी व्यापक स्वरूपात जनजागृती करण्यात यावी असे निर्देश होते.

मा. आयुक्त, अजीज शेख, उपायुक्त, डॉ. सुभाष जाधव, यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण विभागप्रमुख सौ. विशाखा सावंत, यांचेमार्फत उल्हासनगर शहरातील नागरीकांच्या हवेतील प्रदुषण तसेच इतर प्रदुषणाशीसंदर्भात तक्रारींचे जलदगतीने निवारण होण्याच्यादृष्टीने तक्रारी स्विकारण्यासाठी मोबाईल अँप तयार केले आहे. महापालिका मुख्यालयातील स्थायी समिती सभागृहात दिनांक ११/०९/२०२३ रोजी उपस्थित श्री. गणपत गायकवाड, मा. आमदार, डॉ. बालाजी किणीकर मा. आमदार, यांच्याहस्ते सदर मोबाईल अँपचे अनावरण करण्यात आले आहे. त्यावेळेस सदर कार्यक्रमाच्या ठिकाणी श्रीम. मिना कुमार आयलानी, माजी नगरसेविका, श्री. राजेंद्र चौधरी, माजी नगरसेवक, श्री. रामचंदानी, श्री. अमर लुंड, श्री. दिलीप गायकवाड इत्यादी त्याचप्रमाणे महापालिकेचे अति. आयुक्त, जमीर लेंगरेकर, उपायुक्त श्री. अशोक नाईकवाडे, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा श्री. परमेश्वर बुडगे, MIDC चे अधिकारी, पाणीपुरवठा विभागाचे इतर कर्मचारी तसेच श्रीम. छाया डांगळे, जनसंपर्क अधिकारी इत्यादी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमादरम्यान हवेतील प्रदुषण तसेच इतर प्रदुषणाशी संबंधित तक्रारी अनावरण केलेल्या मोबाईल अँपद्वारे कशापध्दतीने कार्य करतील याचीदेखील माहिती पर्यावरण विभागामार्फत सर्व उपस्थितांना देण्यात आली. यामध्ये नागरीकांना सदर अँप डाऊनलोड करून त्यावर तक्रार दाखल करता येणार आहे. सदर तक्रार विभागाकडून संबंधित इतर विभागांकडे वर्ग करण्यात येणार आहे. यामध्ये संबंधित तक्रार निकाली काढण्यासाठी विभागांना कालावधी निश्चित करून देण्यात येणार आहे. त्या कालावधीत प्राप्त तक्रार निकाली निघणे आवश्यक राहिल. याद्वारे प्रदुषणाशी संबंधित तक्रारींचा निपटारा जलद गतीने होणार असल्याची माहिती उपायुक्त डॉ. सुभाष जाधव यांनी दिली.

11/9/23

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — माहितीस्तव.

मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम अँनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.